सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**अपर पोलीस महासंचालक व संचालक,**
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांचे कार्यालय
त्र्यंबकरोड, नाशिक - ४२२००७

☎(०२५३)२३५२१५८, २३५२१६१ ✉ director.mpa.nashik@mahapolice.gov.in

क्र. मपोअ/पशा-1/प.वि.ठि/इलेक्ट्रीक मोटार खरेदी/2025/4712 नाशिक, दि. 25 JUN 2025

**संदर्भ :-** पोलीस निरीक्षक, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान, मपोअ, यांचेकडील रिपोर्ट क्र. 99/2025, दिनांक 24/05/2025

**विषय :-** महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील जलशुध्दीकरण केंद्र येथे नविन इलेक्ट्रीक मोटार खरेदी करणेबावत...

**प्रसिध्दी पत्रक :-**

उपरोक्त विषयास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2014/ प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दि. 01 डिसेंबर, 2016 मधील नियम पुस्तीकेतील परिच्छेद 3.2.3 मध्ये नमुद तरतुदीनुसार महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील जलशुध्दीकरण केंद्र व रेडबीज येथे नविन इलेक्ट्रीक मोटार खरेदी करुन बसविणेकरिता दरपत्रके मागविण्यात येत आहे. त्याबाबतचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे नमुद केला आहे.

**ई-कोटेशन / निविदा / दरपत्रके सादर करणेबाबतचा तपशिल सन 2025-2026**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | कामाचे नांव | :- | **महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील जलशुध्दीकरण केंद्र व रेडबीज येथे नविन इलेक्ट्रीक मोटार खरेदी करुन बसविणेबाबत.** |
| 2. | पुरवठा मुदत | :- | 02 दिवस |
| 3. | पुरवठा करण्याचे ठिकाण | :- | महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक |
| 4. | कोटेशन/दरपत्रके सादर करण्याचा कालावधी | :- | कोटेशन/दरपत्रके मागविणे बाबतचे पत्र निर्गमीते केलेच्या दिनांकापासून 07 (सात) दिवस |
| 5. | कोटेशन/दरपत्रके जमा करण्याची अंतिम तारीख | :- | दि. 03 /06/ 2025, सायकांळी- 06.15 वाजेपर्यंत |
| 6. | कोटेशन/दरपत्रके जमा करण्याचे ठिकाण | :- | आवक-जावक शाखा, प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक |
| 7. | साहित्य/ वस्तु खरेदीचा तपशिल | :- | म.पो.अ., नाशिक येथील जलशुध्दीकरण केंद्र रेडबीज येथे नविन इलेक्ट्रीक मोटार खरेदी करुन पुरवठा करणे, त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे. |

| रेड बीजकरीता नवीन पाण्याची मोटार खरेदीकचा तपशिल | जलशुध्दीकरण केंद्र येथील नवीन पाण्याची मोटार खरेदी तपशिल |
|---|---|
| कंपनी/ मेक :- किर्लोस्कर /क्रॉम्पटन / टेक्सुमो<br>क्षमता:- 10 एचपी, 4 स्टेज ( ISI Mark)<br>आवश्यकतता :- 01 नग | कंपनी/ मेक :- किर्लोस्कर /क्रॉम्पटन / टेक्सुमो<br>क्षमता:- 15 एचपी, ( ISI Mark)<br>आवश्यकतता :- 01 नग |

Scanned with OKEN Scanner

| 8. | वार्षिक दरकरार करणेबाबतच्या अटी व शर्ती :- |
|---|---|
| | 1. दरपत्रकावर " जलशुध्दीकरण केंद्र व रेडबीज येथे नविन इलेक्ट्रीक मोटार खरेदीकरिता दरपत्रके " असे नमुद करुन आपले फर्मचे नाव नमुद करण्यात यावे.<br>2. दरपत्राका मध्ये नमुद सर्व साहित्यांसाठी दर देणे आवश्यक राहील व दर देतांना सर्व करांसहीत नमुद करुन द्यावे. त्यानंतर नमुद दराव्यतिरीक्त अतिरीक्त दर आकारता येणार नाही.<br>3. दरपत्रकातील साहित्य / वस्तुंचे दर हे प्रती नग व आवश्यक तेथे नमुद प्रमाणाप्रमाणे टाकणे आवश्यक राहील. ( उदा. नग / बंडल / बॉक्स / पॅकेट इत्यादी )<br>4. पुरवठा आदेश निर्गमीत झालेनंतर 02 दिवसांत साहित्यांचा / वस्तुंचा / मालाचा पुरवठा महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे आणून देणे बंधनकारक राहील.<br>5. पुरवठाधारकाला दरकराराच्या कालावधीत दरपत्रकातील नमुद साहित्य / वस्तुंचा पुरवठा करणे नाकारता येणार नाही.<br>6. पुरवठादाराने मालाचा पुरवठा विहीत मुदतीत न केल्यास त्याबाबत विलंब शुल्क म्हणुन एकुण देय रकमेच्या 5% रक्कम आकारण्यात येईल व सदरची रक्कम देयकातुन वजा करण्यात येऊन देयक अदा करण्यात येईल.<br>7. साहित्य/वस्तु/बाबनिहाय न्यून.तम पुरवठादाराची नियुक्ती करण्याचे अधिकार महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांना राहील.<br>8. साहित्य/वस्तुंचा दर्जा व पुरवठा समाधानकारक नसल्यास अथवा इतर कोणत्याही कारणामुळे कोणत्याही टप्यावर नाकारण्याचे सर्वाधिकार महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांना राहतील.<br>9. दरपत्रकासोबत आवश्यक कागदपत्रे 1. आधार कॉर्ड, 2. पॅन कॉर्ड, 3. दुकानाचा परवाना, 4. वस्तु व सेवा कर (जीएसटी) नोंदणी प्रमाणपत्र या सर्वांची छायांकित प्रत बंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक राहील.<br>10. पुरवठाधारकाचे देयक हे निधीच्या उपलब्धतेप्रमाणे अदा करण्यात येईल.<br>11. पुरवठाधारकाचे देयकाची रक्कम ऑनलाईन पध्दतीने थेट त्यांचे बँक खात्यामध्ये अदा करण्यात येणार असल्याने त्याकरिता बँक खात्याचा तपशिल बॅक पासबुक / रद्द धनादेश (Cancel Cheque) देयकासोबत सादर करण्यात यावा.<br>12. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रं. संकीर्ण 2018/प्र.क्र.144/2018/कोषा प्रशा-5/, दि.28/09/2018 अन्वये TDS व GST कपातीची आवश्यकतेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. |

**( मा. संचालक यांचे मान्यतेने )**

**( डॉ. काकासाहेब डोळे )**
उपसंचालक (प्रशासन),
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

प्रति,
सहायक संचालक (आय.टी. विभाग), म.पो.अ., नाशिक
२ /- उपरोक्त नमुद कामासाठी आवश्यक दरपत्रके मागविणेबाबत सदरचे प्रसिध्दी पत्रक एमपीए. संकेतस्थळावर नमुद कालावधीकरीता प्रसारीत करावे.
सुचना फलक (नोटीस बोर्ड), म.पो.अ., नाशिक.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
श्री. अनिल गोरे, पोलीस निरीक्षक, पो.द.व मा.तं., म.पो.अ., नाशिक
प्रत माहितीस्तव,
सहायक संचालक (कवायत) , म.पो.अ., नाशिक
सहा. संचालक (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग ) म.पो.अ,नाशिक

Scanned with OKEN Scanner